# आकाशवाणी पुणे
## प्रादेशिक वृत्त विभाग
## पुणे वृत्तांत
## वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 07.11.2024** **वार – गुरुवार**

---

**पाहणी**

पिंपरी विधानसभा मतदारसंघाच्या निवडणुकीसाठी केंद्रीय निवडणूक आयोगाकडून निरीक्षक म्हणून मनवेशसिंग सिध्दू यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्या अनुषंगानं सिध्दू यांनी पिंपरी मतदारसंघाच्या निवडणुकीच्या कामकाजाची सलग तीन दिवस पाहणी केली. स्ट्रॅागरूम, मतदान पेटया वितरण व्यवस्था, मतदान अधिकारी /कर्मचारी यांच्यासाठीचा वाहतूक आराखडा, मतमोजणीसाठी बालेवाडी स्टेडीयम येथील स्ट्रॅागरूम इत्यादी बाबींची त्यांनी पाहणी केली. मतदान केंद्रावर मतदारांसाठी पुरविण्यात आलेल्या रॅम्प, सावली मंडप, पाण्याची व्यवस्था, दिव्यागांसाठी व्हीलचेअर आणि मदतनीस यांची उपलब्धता तसंच मतदान केंद्रावर मतदारांची नांवं शोधण्याची सुविधा यांची त्यांनी विभागीय अधिकाऱ्यांकडून माहिती घेतली. या सुविधा मतदानाच्या दिवशी उपलब्ध करुन देण्याबाबत सूचना दिल्या.

**बदल**

केंद्रीय निवडणूक आयोगाच्या सुचनेनुसार विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीसाठी पुणे कॅन्टोंमेंट मतदारसंघातील 5 मतदान केंद्रांच्या ठिकाणांमध्ये बदल करण्यात आला असून ही मतदान केंद्र गृहनिर्माण संस्थांमध्ये स्थापन करण्यात आली असल्याची माहिती निवडणूक निर्णय अधिकारी सिध्दार्थ भंडारे यांनी कळविली आहे.

**सुट्टी**

विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीमध्ये सर्व मतदारांना त्यांचा मतदानाचा हक्क बजावण्यासाठी 20 नोव्हेंबर 2024 या मतदानाच्या दिवशी उद्योग विभागांतर्गत सर्व आस्थापनांनी अधिकारी, कामगार, कर्मचाऱ्यांना भरपगारी सुट्टी अथवा दोन तासांची सवलत द्यावी, असे निर्देश जिल्हाधिकारी डॉ. सुहास दिवसे यांनी दिले आहेत. यासंदर्भात उद्योग, ऊर्जा, कामगार आणि खनिकर्म विभागानं परिपत्रकाद्वारे जारी केल्याची माहिती डॉ.दिवसे यांनी दिली आहे.

**पाठिंबा**
चिंचवड विधानसभा मतदारसंघातील महाविकास आघाडीतील राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे उमेदवार राहुल कलाटे यांना डांगळे गट रिपब्लिकन जनशक्ती पक्षानं जाहीर पाठिंबा दिला. भोसरी विधानसभा मतदारसंघचे महविकास आघाडीचे उमेदवार अजित गव्हाणे यांनी आज आपल्या मतदार संघात पदयात्रा काढली. पुणे कँटोन्मेंट विधानसभा मतदार संघाचे काँग्रेसचे उमेदवार  रमेश बागवे यांनी कबीर चौक ते पॉवर हाऊस तसेच सलीसबरी पार्क मधील काही गृहसंकुलांमध्येही मतदारांशी संवाद साधला.

**बाईकफेरी**
कोथरूड मतदार संघाचे भाजपाचे उमेदवार चंद्रकांत पाटील यांच्या प्रचारार्थ आज दुचाकी फेरीचं आयोजन करण्यात आलं आहे. पाटील यांनी समाज माध्यमावरील संदेशात ही माहिती दिली आहे.

**सभा**
उत्तर प्रदेशच्या माजी मुख्यमंत्री आणि बहुजन समाज पक्षाच्या प्रमुख मायावती यांची पुढच्या रविवारी, 17 तारखेला दुपारी 12 वाजता येरवड्यातील प्रादेशिक मनोरुग्णालयाच्या मैदानात सभा आयोजित करण्यात आली आहे. बहुजन समाज पक्षानं तळागाळातील समाजाला नेतृत्व देत उत्तर प्रदेशसारख्या देशातील सर्वात मोठ्या राज्यात सत्ता मिळवली. आता महाराष्ट्रातही उपेक्षित वर्गाचा प्रतिनिधी 'बसप'च्या माध्यमातून विधीमंडळात पोहोचेल, असा विश्वास 'बसप'चे प्रदेश महासचिव आणि वडगाव शेरी मतदारसंघातील उमेदवार  हुलगेश चलवादी यांनी  व्यक्त केला.

**एसटीला**
पुणे विभागातून  दिवाळीत सोडलेल्या नियमित आणि जादा बसगाड्यांमधून 15 लाख जणांनी प्रवास केला असून त्यामधून पुणे विभागाला जवळपास 18 कोटी रुपयांचे उत्पन्न मिळालं  आहे. दिवाळीत पुणे एसटी विभागाकडून नियमित आणि खडकी इथल्या मैदानातून जादा बसगाड्या सोडण्यात आल्या. यंदा 550 जादा गाड्या सोडण्याचं नियोजन केलं  होतं. विभागातील 13 आगारांतून 880 जादा गाड्या सोडल्या होत्या. दरम्यान, भाऊबीजेच्या दिवशी पुणे विभागातून  1 लाख 51 हजार प्रवाशांनी प्रवास केला. त्यातून एसटीला दोन कोटी 10 हजारांचे उत्पन्न मिळालं  असून दिवाळीच्या दहा दिवसांतील ही सर्वाधिक प्रवासी संख्या ठरली असल्याचं पुणे विभागाकडून सांगण्यात आलं  आहे .

**घबाडषष्ठी**

आज घबाडषष्ठी आहे. आजचा दिवस उत्तम मुहूर्तांपैकी एक समजला जातो. दिवाळीमध्ये विविध सेवा पुरवणारी मंडळी कामाच्या गडबडीत लक्ष्मीपूजन अनेकदा करू शकत नाहीत. ही मंडळी प्रमुख्यानं पांडव पंचमी आणि घबाडषष्ठीचा मुहूर्त साधून आजच्या दिवशी लक्ष्मीपूजन करतात. मार्केट यार्डातील फुल बाजारात देखील आज दुपारनंतर लक्ष्मी पूजन केलं जातं. उत्तर भारतात आजच्या दिवशी छटपूजा केली जाते.

**मेहता**

“आजची सामाजिक व्यवस्था ही धार्मिक सिद्धांतानुसार घडली पाहिजे. शुद्ध सामाजिक व्यवस्थेच्या माध्यमातून समाजाचं उत्थान होणं आवश्यक आहे”, असं प्रतिपादन रिझर्व बँकेचे माजी विभागीय गव्हर्नर डी. आर. मेहता यांनी काल पुण्यात केलं. जैन इंटरनॅशनल ट्रेड ऑर्गनायझेशन अर्थात ‘जितो’तर्फे आर्थिक सक्षमीकरणासंदर्भात संवादात्मक कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं होतं. त्यावेळी मेहता बोलत होते. पुणे हे भारतातील एकमेव असे शहर आहे की जेथे सेवा संस्था, शिक्षण संस्था, विज्ञान संस्था आणि सांस्कृतिक संस्था यांचा सुरेख मिलाफ पाहायला मिळतो, असे गौरवोद्गारही मेहता यांनी काढले .

**क्रिकेट**

पुणे जिल्हा क्रिकेट संघटनेच्या मान्यतेने एसए-आरके अजिंक्यपद करंडक’ 12 वर्षाखालील मुलांच्या आंतरक्लब क्रिकेट स्पर्धा सुरू आहेत. मुलींच्या गटात या स्पर्धेत सृष्टी भुजबळ हिने केलेल्या अचूक गोलंदाजीच्या जोरावर एसए आरके क्रिकेट ॲकॅडमीने क्षेत्रम स्पोर्टस् ॲकॅडमीचा 83 धावांनी सहज पराभव केला. मुलांच्या गटात विवान देशमुख याने केलेल्या कामगिरीच्या जोरावर क्रिकेट नेक्स्ट ॲकॅडमीने विराग क्रिकेट ॲकॅडमीचा 71 धावांनी सहज पराभव केला.

**हवामान**

पुणे आणि परिसरात आज कमाल तापमान 32 तर किमान तापमान 17 अंश सेल्सिअस नोंदवलं गेलं. उद्या आकाश मुख्यत: निरभ्र राहण्याची शक्यता वेधशाळेनं वर्तवली आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविधभारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**